क्रमांक:पोअवा/आस्था/बॅण्ड पथक/ 481 /२०१७.
कार्यालय पोलीस अधीक्षक, वाशिम.
वाशिम. दिनांक :- 4 JAN 2018

विषय :- बॅण्ड पथकाबाबत....

---०००००----

**परिपत्रक :-**

आमचे असे निदर्शनास आले आहे की, वाशिम जिल्हा पोलीस दलात बॅण्ड पथकाची निर्मीती करण्यात आली असुन बॅण्ड पथकात भरती झालेले काही पोलीस कर्मचारी हे बॅण्ड पथकात नियमित प्रमाणे कर्तव्य पार न पाडता पोलीस स्टेशन / शाखेत किंवा कार्यालयास कर्तव्य पार पाडल्याचे दिसून आले आहेत. तसेच काही पोलीस कर्मचारी हे बॅण्ड पथकात भरती होवून आंतर जिल्हा बदलीवर बदलून आल्यावर बॅण्ड पथकात कर्तव्य पार न पाडता इकडे तिकडे पोलीस स्टेशन / शाखेत व कार्यालयास काम केल्याचे दिसून आले आहे. जे नियमानुसार नाही. वाशिम जिल्हा पोलीस दलात १८ जागा बॅण्ड पथकाचे व ०३ जागा बिग्युलर यांची आहे.

२/- बॅण्ड पथकात भरती झालेले पोलीस कर्मचारी वाशिम जिल्हात कार्यरत असुन सुध्दा वाशिम जिल्हा पोलीस दलाचे बॅण्ड पथकात फक्त ०६ कर्मचारी हे व्यवस्थित रित्याने कर्तव्य पार पाडत आहे. उर्वरीत ०९ पोलीस कर्मचारी पैकी ०३ बॅण्ड पथकातील पोलीस कर्मचारी हे लाईट डयुटीवर असुन व ०६ कर्मचारी हे कोणत्याही वाद्य व बॅण्ड पथकात काम व्यवस्थित रित्याने करत नसल्याचे दिसून आले आहे.

२१/०१/८

३/- महाराष्ट्र शासन राजपत्र भाग चार-ब, गुरुवार ते बुधवार जून २३-२९, २०११/आषाढ २-८, शके १९३३ गृह विभाग, मंत्रालय मुंबई दिनांक १६ जून, २०११ मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ (२)(ब) (ब)(iv) अन्वये **"पोलीस बॅड पथकासाठी निवड करण्यात आलेले उमेदवार कार्यकारी शाखेत बदलीसाठी पात्र असणार नाहीत. मात्र हे उमेदवार जिल्हयाच्या बाहेर फक्त इतर पोलीस घटकातील बँड पथकात बदलीस पात्र ठरतील"**, असे नमुद आहे. बॅण्ड पथकात भरती झालेले पोलीस कर्मचारी यांची भरती बॅण्ड पथका करीता भरती झाली असुन त्यांना बॅण्ड पथकाचे कर्तव्य व्यवस्थित रित्याने पार पाडणे आवश्यक आहे. परंतु सदर कर्मचारी हे बॅण्ड पथकात कर्तव्य पार पाडल्याचे दिसून येत नाही. यापुढे जे कर्मचारी बॅण्ड पथकात व्यवस्थित रित्याने कर्तव्य पार पडू शकत नाही अशा कर्मचाऱ्यांचे विरुध्द शिस्तभंग विषयक कार्यवाही करुन त्यांचे जागी बॅण्ड पथकात काम करणारे इच्छूक व व्यवस्थित रित्याने काम करणाऱ्या पोलीस कर्मचारी यांची भरती घेण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

४/- या परिपत्राकाद्वारे आदेशीत करण्यात येते की, जे पोलीस कर्मचारी बॅण्ड पथकात भरती झालेले आहेत व ते लाईट डयुटी वर पोलीस मुख्यालय, वाशिम येथील बॅण्ड पथक सोडून पोलीस स्टेशन/शाखेत व कार्यालयास कार्यरत आहेत, अशा कर्मचारी यांना सदरचे परिपत्रक प्राप्त होताच त्यांना पोलीस मुख्यालय, वाशिम येथील बॅण्ड पथकात काम करण्या करीता परत करण्यात यावे. नमुद कर्मचारी यांना पोलीस मुख्यालय, वाशिम येथील बॅण्ड पथकात समाविष्ठ करुन त्यांना सकाळ / संध्याकाळ दोन्ही वेळेत बॅण्ड चे सराव करुन द्यावेत. तसेच बॅण्ड पथकातील सरावा व प्रशिक्षणास टाळाटाळ करतील अशा कर्मचारी यांचे कसूरी अहवाल विनाविलंब पुढील कार्यवाही करीता आमच्या समक्ष सादर करावा.

५/- राखीव पोलीस निरीक्षक पोलीस मुख्यालय, वाशिम यांनी बॅण्ड पथकातील भरती झालेले सर्व कर्मचारी यांना सकाळ / संध्याकाळ दोन्ही वेळेत बॅण्डचा सराव करुन घेण्यात यावा. तसेच पोलीस मुख्यालयातील परेड व १५ ऑगस्ट, २६ जानेवारी व १ मे करीता महाराष्ट्र पोलीस नियमावली भाग-१ मधील तरतुदीचे अधीन राहून बँड खाजगी कार्यक्रमासाठी भाडयाने दिला जावू शकेल अशा प्रकारे सुस्वच्छ व सुव्यवस्थित बॅण्ड पथक निर्माण करावे जेणेकरुन पोलीस कल्याण निधी मध्ये याचा उपयोग पोलीस कर्मचारी यांचेकरीता होवू शकले. तसेच पोलीस बॅण्ड पथकाकरीता लागणारे साहित्य व कर्मचारी यांचे गणवेषाकरीता आवश्यकता नुसार अहवाल आमच्या समक्ष सादर करावा.

७/- राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय, वाशिम यांनी बॅण्ड पथकाचे प्रगती अहवाल दर महिन्याचे १ तारखेला आमच्या समक्ष न चुकता सादर करावा.

**( मोक्षदा पाटील )**

पोलीस अधीक्षक, वाशिम

प्रति,

राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय, वाशिम/ कार्यालय अधीक्षक पोलीस अधीक्षक कार्यालय, वाशिम.

२/- कार्यालय अधीक्षक या कळविण्यात येते की, बॅण्ड पथकात कार्यरत असलेले जे कोणी पोलीस कर्मचारी पो.स्टे., व शाखेत किंवा कार्यालयास कामकरीत असतील असा पोलीस कर्मचारी यांना सदरचे परिपत्रक प्राप्त होताच त्यांना बॅण्ड पथकात काम करण्याकारीता पोलीस मुख्यालय, वाशिम येथे त्वरीत रवाना करावे.

३/- रापोनि.,पो.मु., वाशिम यांनी जे कोणी पोलीस कर्मचारी बॅण्ड पथकात भरती झालेले आहे अशा कर्मचारी यांना पोलीस बॅण्ड पथक, वाशिम येथे बोलवून त्यांचे बॅण्ड चे सरावा सदरचे परिपत्रक प्राप्त होताच सुरु करावे, व तशा पुर्तता अहवाल उलट-टपाली या कार्यालयास न चुकता सादर करावा.

प्रत माहितीस :-

उपाविभागीय पोलीस अधीकारी, वाशिम / पोलीस उपअधीक्षक(मुख्या.), वाशिम /संगणक कक्ष/ डिपीजी लिपीक पोलीस अधीक्षक कार्यालय वाशिम.